॥ संत तुकाराम यांचे सांखळीचे अभंग ॥

Tukarama's Last Abhangas

सांखळीचे अभंग

श्री तुकाराम महाराज सदेह वैकुंठाला गेल्याचे कळताच
त्यांचे शिष्य इंद्रायणी नदीवर गेले व तेथे श्रीतुकारामांचे
दर्शन झाल्याशिवाय अन्न घ्यायचे नाही असा निश्चय करून राहिले.
तीन दिवसानंतर पंचमीच्या दिवशी आकाशातून त्यांचे टाळ.
गोधडी व हे अभंग खाली आले. ते "साखळीचे अभंग" म्हणून
प्रसिद्ध आहेत .

हे अभंग गुरुदेव रानडे यांच्या निंबाळ आश्रमांत नित्य-नेमावलींत
गातात. गुरुदेव हे नाथ संप्रदायातील निंबर्गी उपसंप्रदायातले एक
महा विद्वान भक्त होते 1886–1957}

१
जन्माचें तें मूळ पाहिले शोधून । दुःखासी कारण जन्म घ्यावा ॥ १॥
पाप पुण्य करुनी जन्मा येतो प्राणी । नरदेहा येवुनी हानी केली ॥ २॥
रजतमसत्व आहे ज्याचे अंगीं । याच गुणें जगीं वाया गेला ॥ ३॥
तम म्हणजे काय नरकचि केवळ । रज तो सबळ मायाजाळ ॥ ४॥
तुका म्हणे ऐका सत्वाचे सामर्थ्य । करवी परमार्थ अहर्निशीं ॥ ५॥
२
अहर्निशीं सदा परमार्थ करावा । पाय न ठेवावा आडमार्गीं ॥ १॥
आडमार्गीं कोणी जन जे जातील । त्यांतून काढील तोचि ज्ञानी ॥ २॥
तोचि ज्ञानी खरा तारी दुजीयांसी । वेळोवेळा त्यासी शरण जावें ॥ ३॥
आपण तरेल नव्हे ते नवल । कुळें उद्धरील सर्वांची तो ॥ ४॥
शरण गेलिया काय होतें फळ । तुका म्हणे कुळ उद्धरिलें ॥ ५॥
३
उद्धरिलें कुळ आपण तरला । तोचि धन्य झाला त्रैलोक्यांत ॥ १॥
त्रैलोक्यांत भला अद्वैतीं निमाला । योग जो साधिला साधन बरें ॥ २॥
बरें जें साधन सुख शांत मन । क्रोध नाहीं जाण तिळभरी ॥ ३॥
तिळभरी दोष नाहीं तें निर्मळ । तुका म्हणे जळ गंगेचें तें ॥ ४॥
४
जैसी गंगा वाहे तैसें त्याचें मन । भगवंत जाण तया जवळी ॥ १॥
तया जवळी देख भक्तिभावें उभा । स्वानंदाचा गाभा तया दिसे ॥ २॥

तया दिसे रूप अंगुष्ठ-प्रमाण । अनुभवी खूण जाणती हे ॥ ३॥
जाणती हे खूण स्वात्माऽनुभवी । तुका म्हणे पदवी ज्याची त्याला। ४॥
५
ज्याची त्याला पदवी येराला न साजे । संताला उमजे आत्मसुख ॥ १॥
आत्मसुख घ्यारे उघडा ज्ञानदृष्टी । वाउगी चावटी नका करूं ॥ २॥
नका करूं कांहीं संतसंग धरा । पूर्वीचा दोर उगवेल ॥ ३॥
उगवेल प्रारब्ध संतसंगें करुनी । प्रत्यक्ष पुराणीं वर्णियेले ॥ ४॥
वर्णियेली कीर्ति नामरूप घोष । जातील ते दोष तुका म्हणे ॥ ५॥
६
दोष ते जातील अनंत जन्मींचे । पाय ते देवाचे न सोडावे ॥ १॥
न सोडावे पाय ऐसा निश्चय करा । आळवा शार्ङ्गधरा भावबळें ॥ २॥
धरुनी केशवा आणा भावबळें । पापीया नकळे कांही केल्या ॥ ३॥
न कळे तो देव सत्संगावांचुनी । वासना जाळोनी शुद्ध करा ॥ ४॥
शुद्ध करा मन व्हा रे देहातीत । ओळखा वस्तूतें तुका म्हणे ॥ ५॥
७
वस्तूतें ओळखा सांडा रे कल्पना । नका आडराना जाऊं झणी ॥ १॥
झणीं जाल कोठें बुडवाल हित । विचारी मनांत आपुलिया ॥ २॥
आपुलिया जीवें शिवासी पहावें । आत्मसुख घ्यावें वेळोवेळां ॥ ३॥
घ्यावें आत्मसुख स्वरूपीं मिळावें । भूतीं लीन व्हावें तुका म्हणे ॥ ४॥
८
भूतीं लीन व्हावें सांगावें नलगेचि । आतां अहंकाराची शांती करा ॥ १॥
शांती करा तुम्ही ममता नसावी । अंतरीं असावी भूतदया ॥ २॥
भूतदया ठेवी तया काय उणें । प्रथम साधन हेंचि असे ॥ ३॥
असें जें साधन जया चित्तीं वसे । मायाजाळ नासे तुका म्हणे ॥ ४॥
९
मायाजाळ नासे या नामेंकरुनी । प्रीती चक्रपाणी असों द्यावी ॥ १॥
असों द्यावी प्रीती साधूचे पायांसी । कदा कीर्तनासी सोडूं नये ॥ २॥
सोडूं नये कीर्तन पुराणश्रवण । मनन निजध्यासन साक्षात्कार ॥ ३॥
साक्षात्कार झालिया सहज समाधि । तुका म्हणे उपाधि गेली त्याची ॥ ४॥
१०
गेली त्याची जाणा तोचि ब्रह्म झाला । अंतरीं निवाला पूर्णपणें ॥ १॥
पूर्णपणें धाला राहतो कैसा रीती । त्याची आतां स्थिती सांगतों मी ॥ २॥
सांगतों मी तुम्हा ऐका मनोगत । राहतो मूर्खवत जगामाजीं ॥ ३॥
जगांत पिशाच अंतरी शहाणा । सदा ब्रह्मी जाणा निमग्न तो ॥ ४॥
निमग्न तो सदा जैसा मकरंद । अंतर्बाह्य भेद वेगळाले ॥ ५॥
वेगळाले भेद कृष्णी त्या असती । हृद्गद त्याची गती नकळे कवणा ॥ ६॥

नकळे कवणाला तयाचे ते वर्म । योगी जाणे मर्म-खूण त्याची ॥ ७॥
खूण त्याची जाणे जे कां तैसे असती । तुका म्हणे भ्रांती दुजीयाला ॥ ८॥

११

दुजियाला भ्रांती भाविकाला शांती । साधूंचिया वृत्ती लीन झाल्या ॥ १॥
लीन झाल्या वृती ब्रह्मीं ते मिळाले । जळांत आटले लवण जैसे ॥ २॥
लवण जैसे पुन्हा जळाचे बाहेर । येत नाही खरें त्यांतुनीया ॥ ३॥
त्यासारिखी जाणा तुम्ही साधुवृत्ती । पुन्हां न मिळती मायाजाळीं ॥ ४॥
मायाजाळ त्यांना पुन्हा रे बाधेना । सत्य सत्य जाणा तुका म्हणे ॥ ५॥

१२

स्वर्गलोकींहुनी आले हे अभंग । धाडियेले सांग तुम्हालागीं ॥ १॥
नित्य नेमें यासी पढतां प्रतापें । जळतील पापें जन्मांतरींची ॥ २॥
तया मागें पुढें रक्षी नारायण । मांडिल्या निर्वाण उडी घाली ॥ ३॥
बुद्धीचा पालट नासेल कुमती । होईल सद्गती येणें पंथें ॥ ४॥
सद्गती झालिया सहज साक्षात्कार । होईल उद्धार पूर्वजांचा ॥ ५॥
साधितील येणें इहपरलोक । सत्य सत्य भाक माझी तुम्हां ॥ ६॥
परोपकारासाठीं सांगितले देवा । प्रासादिक मेवा ग्रहण करा ॥ ७॥
येणें भवव्यथा जाईल तुमची । सख्या विठ्ठलाची आण मज ॥ ८॥
टाळ आणि कंथा धाडिली निशाणी । घ्यारे ओळखोनि सज्जन हो ॥ ९॥
माझें दण्डवत तुम्हां सर्व लोकां । देहासहित तुका वैकुंठासी ॥ १०॥

१३

सत्य सत्य जाणा त्रिवाचा नेम हा । अनुभव पहा पदोपदीं ॥ १॥
पदोपदीं पहा श्रीमुख चांगलें । प्रत्यक्ष पाऊले विठोबाची ॥ २॥
विठोबाची भेटी घडेल वाचितां । तुम्हालागीं आतां सांगितलें ॥ ३॥
सांगितलें खरें विश्वाचिया हिता । अभंग वाचितां जे कां नर ॥ ४॥
ते नर पठणीं जीवन्मुक्त झाले । पुन्हां नाही आले संसारासी ॥ ५॥
संसार उडाला संदेह फिटला । पूर्ण तोचि झाला तुका म्हणे ॥ ६॥

१४

पांच कोटि एक लक्षाचा शेवट । चौतीस सहस्र स्पष्ट सांगितले ॥ १॥
सांगितले इतुके कथुनियां गेला । बारा अभंगाला सोडूं नका ॥ २॥
सोडूं नका तुम्हा सांगितले वर्म । भवपाश-कर्म चुकतील ॥ ३॥
चुकती यातायाती विठोबाची आण । करा हे पठण जीवेंभावें ॥ ४॥
जीवेंभावें करिता होईल दर्शन । प्रत्यक्ष सगुण तुका म्हणे ॥ ५॥

१५

वेदांचे अभंग केले श्रुतिपर । द्वादश सहस्र संहितेचे ॥ १॥
निघंट निरुक्त आणि ब्रह्मसूत्र । अवतार सहस्र उपग्रंथ ॥ २॥
अभंग ते कोटि भक्तिपर झाले । ज्ञानपर बोलिले तितुकेचि ॥ ३॥

पंचाहत्तर लक्ष वैराग्य वर्णिलें । नाम तें गाइलें तितुकेंची ॥ ४ ॥
साठ लक्ष केला बोध या जनासी । वर्णिले रूपासी तितुकेंची ॥ ५ ॥
तीस लक्ष केली देवासी करुणा । कर्मकांड जाणा एक लक्ष ॥ ६ ॥
द्वादश सहस्र स्वात्माऽनुभव । एवं जाणा सर्व संख्या ऐशी ॥ ७ ॥
ऐसे हे अभंग झालेसे भूतळीं । बारा अंतराळीं पत्रिकेचे ॥ ८ ॥
चौतीस सहस्र लक्ष एक कोटी पांच । सांगोनिया साच गेला तुका ॥ ९ ॥
१६
सगुण हें ब्रह्म विठ्ठलचि बोले । ऐक पां वहिले तुकारामा ॥ १ ॥
तुकारामा तुवां केले जे अभंग । करिती जे कां जगीं नित्य पाठ ॥ २ ॥
जगीं पाठ करितां आवडी सद्भावे । विपत्ति न होय त्या प्राण्यासी ॥ ३ ॥
प्राण्याचें कल्याण होईल बा पाहे । भावे वाचितां हे नित्य नेमें ॥ ४ ॥
नेमें संकष्टासी करी अकरा पाठ । विघ्न त्याचें स्पष्ट दूर होय ॥ ५ ॥
दूर होय विघ्न विठ्ठल म्हणे तुकया । शेवटी निज ठायां नेईन मी ॥ ६ ॥
॥ इति ॥

Please send corrections to Sunder Hattangadi (sunderh@hotmail.com)
Last updated November 17, 1998